| | | | |
|---|---|---|---|
| 19 | निर्मला कारभारी वाघ | दारिद्र्यता : एक समस्या | 83 |
| 20 | गायकवाड श्रीहरी रामराव<br>कृष्णाकांत नागनाथ कांबळे | लातूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादनाचे अभिक्षेत्रीय विश्लेषण | 86 |
| 21 | गायकवाड श्रीहरी रामराव | लातूर जिल्ह्यातील वाहतूक व दळणवळणाचा औद्योगिकीकरणावर होणारा परिणाम : एक भौगोलिक अभ्यास | 89 |
| 22 | धावणे डी.एस.<br>डॉ.ए.ए. काळगापुरे | बिदर जिल्ह्यातील रासायनिक खत केंद्रीकरण निर्देशांक : एक भौगोलिक अभ्यास | 92 |
| 23 | डॉ.राठोड रोहिदास शरद<br>डॉ.ज्योती पांचाळ | यवतमाळ जिल्ह्यातील कृषी यांत्रिकीकरणाच्या स्तरातील बदलाचा भौगोलिक अभ्यास | 94 |
| 24 | श्रीमती आर. व्ही. पाटील | शाश्वत शेती : आधुनिक काळाची गरज | 97 |
| 25 | प्रा. डॉ. दत्तात्रय शिंदे | भारतातील शेतीच्या समस्या : जत तालुक्यातील शेतीसमस्यांचा एक नमुना अभ्यास (जि.सांगली—महाराष्ट्र) | 100 |
| 26 | दिग्विजय दत्तात्रय कुंभार | राधानगरी धरणाचे कोल्हापूर जिल्ह्याच्या कृषी विकासातील योगदान | 104 |
| 27 | प्रा. श्रीमती. आर. एन. नाठे | व्यापारी भूगोलातील आधुनिक प्रवाह | 108 |
| 28 | प्रा.स्वामी रामेश्वर राजकुमार | नांदेड जिल्ह्यातील उच्च उत्पादन देणा-या कापूस पिकाच्या बियाणांचा अभ्यास | 111 |
| 29 | प्रा. वाघमारे व्ही.बी | भारतीय आर्थिक मंदी आणि उद्योग क्षेत्र सध्य स्थिती | 113 |
| 30 | डॉ. ढाले गौतम नामदेव | महाराष्ट्रातील ऐतिहासिक दृष्टिकोनातून किल्ल्यांचे संवर्धन | 117 |
| 31 | प्रा.यशवंत भालचंद्र खैरनार | चलेजाव चळवळीत नाशिक जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचा सहभाग | 121 |
| 32 | क्रांतीसिंह मारूती देसाई | 14 ,एप्रिल 1944 साली उडालेला गोदीतील धडाका | 125 |
| 33 | डॉ. अर्चना टाक | १८९७ चा शिवजयंती उत्सव व अहमदनगर एज्युकेशन सोसायटी | 127 |
| 34 | श्रीमती व्हसमने सुरेखा बसाप्पा | २१ व्या शतकातील स्त्रीवादी चळवळीच्या दिशा | 131 |
| 35 | प्रा.डॉ.किशोर मो. डुमणे | २१ व्या शतकातील स्त्रीवाद | 135 |
| 36 | डॉ.संगीता संपत पाटील | ३ सप्टेंबर १९४२ चा तासगांव चा ऐतिहासिक मोर्चा | 139 |
| 37 | प्रा. श्रीधर भाऊसाहेब शिंदे | वसतिगृहे : मागासवर्गियांच्या शिक्षणाची गरज | 143 |
| 38 | प्रा.डॉ. क्षीरसागर उर्मिला न. | क्रांतिसिंह नाना पाटील व स्वातंत्र्यलढा | 146 |
| 39 | प्रा. मनिषा श्रीणिककुमार पाटील | मुस्लिम सत्यशोधक समाज आणि हमिद दलवाई यांच्या विशेष संदर्भात | 149 |
| 40 | डॉ. निकम आर.डी. | भारतीय स्वातंत्र्य लढयातील यशवंतराव चव्हाणांचे योगदान | 153 |
| 41 | प्रा. डॉ. ज्ञानोबा तुकाराम कदम | भारतातील स्त्री सुधारणा चळवळ | 155 |
| 42 | डॉ.अविनाश दिगंबर फुलझेले | डॉ. आंबेडकर पूर्व विदर्भातील दलित चळवळ | 157 |

33

# १८९७ चा शिवजयंती उत्सव व अहमदनगर एज्युकेशन सोसायटी

**डॉ. अर्चना टाक**
इतिहास विभागप्रमुख,राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),लातूर.
मो.नं. : ९८५००८२४०३, **E-mail I-dept.of.history.rsml@gmail.com**

पंधराव्या शतकात पोर्तुगीज, सोळाव्या शतकात डच, ब्रिटिश व सतराव्या शतकात फ्रेंच या युरोपियनांचे भारतात आगमन झाले. हे युरोपियन 'व्यापार करणे व नफा कमावणे' हा एकमेव शुद्ध हेतू ठेवून भारतात आले होते. इथे आल्यावर भारतभूमीची संपन्नता व समृद्धता यांची त्यांना प्रत्यक्ष जाणीव झाली व ते इथे आपले पाय भक्कम रोवण्याचे प्रयत्न करू लागले. त्यातून या सत्तांमध्ये स्पर्धा व संघर्ष झाले. त्यात ब्रिटिशांना विजय मिळाला. फक्त आर्थिक उद्देशपूर्तीसाठी भारतात आलेल्या ब्रिटिशांना येथिल परिस्थिती अनुकूल ठरल्याने ते याठिकाणी आपले राज्य स्थापन करू शकले. याच दरम्यान ख्रिश्चन धर्माचा प्रचार प्रसार करण्यासाठी ख्रिस्ती मिशनरीही युरोपातून भारतात मोठया प्रमाणात येत होते. भारतात येताच त्यांनी सामाजिक सेवा कार्याला प्रारंभ करून भारतीय समाजाला आपलेसे करून घेण्यास सुरूवात केली. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी इथे शिक्षणसंस्था सुरू केल्या. इथे राज्यकर्ते बनलेल्या ब्रिटिशांनाही आपल्या हाताखाली काम करणारा वर्ग हा प्रशिक्षित व इंग्रजी भाषा जाणणारा हवा होता. ख्रिस्ती मिशनरी व ब्रिटिश राज्यकर्ते या दोन्हींच्या संयोगातून भारतात एक नवी शिक्षणपद्धती आकारास आली. त्यांच्या गरजेतून निर्माण झालेले हे शिक्षण भारतीय समाजाला एका वेगळया दिशेने घेऊन गेले. भारतीय समाजात आधुनिकतेची नवी पहाट या नव्या शिक्षणपद्धतीमुळेच उदयाला आली.

इ.स. १८८२ च्या हंटर कमिशनच्या अहवालातील शिफारशींनुसार ब्रिटिशांनी देशी शिक्षणसंस्थांना प्राधान्य देऊन सरकारी शाळा त्यांच्याकडे देण्यास सुरूवात केली होती. याचवेळी अहमदनगरमधील स्थानिक लोकांनी एकत्र येऊन इ.स. १८८६ यावर्षी अहमदनगर एज्युकेशन सोसायटी या शिक्षणसंस्थेची स्थापना केली होती. अहमदनगरमधील सर्वात जुन्या असलेल्या या संस्थेचा विस्तार जिल्हयातील चार तालुक्यांत झालेला आहे. नगर, राहता, पारनेर व राहुरी या चार तालुक्यांत मिळुन संस्थेच्या एकूण चौदा शाखा ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. त्यात पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, अध्यापक विद्यालय इत्यादींचा समावेश आहे. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यावसाश्कि शिक्षण या संस्थेने उपलब्ध करून दिले आहे. प्राथमिकपासून ते थेट उच्च शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आज नगर शहरात आहेत. गेल्या काही वर्षांत वेगवेगळे अभ्यासक्रमही सुरू झाले आहेत. आधुनिक काळात नगरच्या या शैक्षणिक परंपरेची मुहूर्तमेढ रोवली ती अहमदनगर एज्युकेशन सोसायटी या संस्थेने. सुरूवातीच्या काळात या संस्थेने ज्या अनेक आव्हानांचा सामना केला, त्यापैकी एक आव्हान म्हणजे ब्रिटिश सरकारची मर्जी राखण्याचे आव्हान होय. १८९७ यावर्षी अहमदनगर शहरात सार्वजनिक स्वरूपात साजऱ्या करण्यात आलेल्या शिवजयंती उत्सवाचे आयोजन या संस्थेने केले होते व त्याचा परिणाम त्यांना या आव्हानाला सामोरे जावे लागले होते. त्याचाच अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**उद्देश :**

१. स्वातंत्र्य अस्मिता उभी करण्यात अहमदनगर एज्युकेशन सोसायटीने बजावलेल्या भूमिकेचा अभ्यास करणे.
२. स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारी मदतीवर चालणाऱ्या देशी शिक्षणसंस्थांपुढे असलेल्या ब्रिटिश सरकारची मर्जी राखण्याच्या आव्हानाचा अभ्यास करणे.

राष्ट्रजागृतीचे, जनमत तयार करण्याचे आणि ब्रिटिश शासनाबद्दल जनतेच्या मनात असंतोष निर्माण करण्याचे महान कार्य करणाऱ्या तसेच भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी इ.स. १८९४ यावर्षी गणेश उत्सव व इ.स. १८९६ यावर्षी शिवजयंती उत्सव या उत्सवांस प्रारंभ केला. इ.स. १८९४ पूर्वीही गणेश उत्सव साजरा केला जात असे. परंतु त्याचे स्वरुप घरगुती असे. लोकमान्य टिळकांनी त्याला सार्वजनिक स्वरुप दिले. याद्वारे हिंदूंना संघटित करणे तसेच त्यांच्यात राष्ट्रीयता निर्माण करणे हा त्यांचा मानस होता. अशा प्रकारे लोकमान्य टिळकांनी धार्मिक देवाचा राजकारणाच्या ध्येयासाठी वापर केला. धर्म हा समाजाचा आत्मा होता. आपल्या ध्येयाप्रत जाण्यासाठी लोकमान्य टिळकांनी त्याचा आधार घेतला.

गणेश उत्सवाप्रमाणेच दिनांक १९ एप्रिल १८९६ या छत्रपती शिवाजींच्या जन्मतिथीच्या दिवसापासून लोकमान्य टिळकांनी रायगडावरून शिवजयंती उत्सवास सुरूवात केली. त्यांच्या मते, शिवाजी हे साहस, आत्मसन्मान, वीरता तसेच उदारतेचे प्रतिक होते. त्यांनी मध्ययुगीन भारताच्या इतिहासात महाराष्ट्राचे नाव अमर केले. भारतीयांनी शिवाजी महाराजांच्या या गुणांपासून प्रेरणा घ्यावी. शिवाजींच्या माध्यमातून लोकमान्य टिळक जनतेत राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्याच्या भावनेवर भर देऊ इच्छित होते.

तरुणांच्या अंत:करणतील धर्मप्रेम व राष्ट्रप्रेम उत्स्फुर्त करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी हे उत्सव सुरु केले होते. त्याचे पडसाद ज्याप्रमाणे महाराष्ट्रात ठिकठिकाणी उमटले त्याप्रमाणे अहमदनगरमध्येही उमटले. शिवजयंती उत्सवाची प्रथानगरच्या काही मंडळींनी इ.स. १८९६ पासूनच सुरु केली होती. इ.स. १८९७ मध्ये नगरमध्ये शिवजयंती उत्सव सोसायटी हायस्कूलच्या पटांगणात मोठया थाटामाटात साजरा करण्यात आला होता. या कार्यक्रमाला नगरचे नागरिक मोठया संख्येने हजर होते. सोसायटी हायस्कूलमधील शिक्षक श्री. शिवराम एकनाथ भारदे, श्री. गणेश कृष्ण दाभोळकर, श्री. धोंडो आत्माराम धसे व श्री. रंगनाथ गजानन निसळ यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सोसायटी हायस्कूलचे त्यावेळचे मुख्याध्यापक श्री. माधव हरी मोडक यांचे अध्यक्षिय भाषण ठरविले होते. श्री. मोडक हे मुळचेच उत्तम वक्ते असल्यामुळे त्यांचे भाषण श्रोत्यांना रोमांचित करणारे व स्वराज्य काळ अगदी जवळ आला आहे असे दर्शविणारे होते. सरकारी अहवालात त्यांच्या भाषणाचा सारांश पुढीलप्रमाणे देण्यात आला होता.

परमेश्वर चिंतनाने जर इच्छित हेतू साध्य होतात तर शिवछत्रपतींच्या चरित्रचिंतनाने आपणांस भूतकालीन वैभव प्राप्त होईलच. उत्कर्षापकर्षाचें राहाट गाडगे प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात सतत फिरत असते. या नियमाप्रमाणे आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्यकाळ अगदी नजिक आला आहे. आपले स्वातंत्र्य परक्याकडे थोडया काळापुरते गहाण पडलेले आहे हे लक्षात ठेवा. आज नाहीतर उद्या ते आपणांस परत मिळणारच. मात्र स्वातंत्र्याची स्मृती आपल्या अंत:करणातून नष्ट होता कामा नये. परक्या लुटारुंनी भारतवर्षातुन संपत्तीच्या गोण्या उंटावरुन वाहून नेल्या तरी आमचे काहीच नुकसान झाले नाही. पण अनंतपटीने खरे जे नुकसान झाले ते म्हणजे आमच्या विद्यार्थ्यांच्या हातात खोटया आणि अपमानकारक विधानांचीं पुस्तकें शिक्षणासाठी दिलीं जातात त्यामुळे झालें. त्यामध्ये आमचें मुलांस काय सांगितले जाते, तर हिंदू हे बोलून चालून रानटी आहेत. त्यांनी युरोपियनांशी लढणे म्हणजे कोकराने लांडग्याशीं लढण्यासारखें आहे. माझी तुम्हांस अशी प्रार्थना आहे कीं, तुम्ही शूर मराठयांचे बच्चे आहांत ही स्मृति सदा अंत:करणात जागृत ठेवा. आमच्या शिवप्रभूंजवळ लंगोटबंद मावळयांचाच परीवार होता. पण कृतांताप्रमाणे भासणाऱ्या अवरंगजेबाला त्यांनी सळो की पळो केलें. शिवप्रभुंजवळ इंग्लंडसारखा सज्ज फौजफाटा नव्हता. त्यांच्याजवळ आजच्यासारखें काहीच नव्हते. समोरासमोर दोन भालातरवारींचे हात करून शत्रुला नामोहरम करण्याची त्यांची युद्धपद्धती होती. अही, लक्षांत ठेवा कीं, १८५७ मध्ये एकदीड दिवसच हिंदुमुसलमानांची शेंडी दाढी एक झाल्याबरोबर त्याचं दिवशीं गोऱ्यांचे पाय इंग्लंडच्या वाटेकडे वळले ही कल्पित कथा नव्हे. शिवप्रभुंचा जयजयकार असो.

त्यावेळेस सोसायटीच्या शाळेतील एक विद्यार्थी लालचंद पुनमचंद हा सुदर्शन हे साप्ताहिक नगरला चालवत होता. त्याने आपल्या सुदर्शन या साप्ताहिकाच्या दिनांक १५ मे १८९७, दिनांक

२३ मे १८९७, दिनांक ३१ मे १८९७ व दिनांक ०८ जून १८९७ या लागोपाठ चार अंकांमध्ये श्री. मोडक यांचे हे जळजळीत भाषण छापुन प्रसिद्ध केले. हे भाषण छापण्याच्या कामात श्री. भारदे, श्री. दाभोळकर, श्री. धसे व श्री. निसळ हे सोसायटीचे शिक्षकही सक्रिय सहभागी होते. त्याकाळी वृत्तपत्रांवर अनेक सरकारी निर्बंध होते. कुठलेही वृत्तपत्र अथवा साप्ताहिक छापले की त्याची एक प्रत सरकार दरबारी जमा करणे हा त्यापैकीच एक निर्बंध होता. त्यानुसार ज्या अंकांमध्ये श्री. मोडक यांचे भाषण प्रसिद्ध झाले होते ते अंक सरकारजमा झाल्यानंतर मोठे वादळ उठले. सरकारी चौकशीला सुरूवात झाली. यासंबंधात कमिशनर व वरिष्ठ शिक्षणाधिकारी (डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन) मिस्टर जाईल्स यांच्यात गुप्त पत्रव्यवहार सुरु झाला. सरकारी आदेशाप्रमाणे डी.पी.आय.मि. जाईल्स हे ३० नोव्हेंबर १८९७ रोजी नगरला आले. त्यांनी ताबडतोब सोसायटीला नियामक मंडळाची सभा भरविण्यास सांगितले व मोडक यांच्या भाषाबद्दल नियामक मंडळाचे काय मत आहे ते आपल्याला कळवावे असा हुकूमही दिला. श्री. मोडक यांचे हे भाषण राजद्रोहाला उत्तेजन देणारे असून लोकांमध्ये सरकारबद्दल अप्रियता निर्माण करणारे आहे, असे नियामक मंडळाला वाटले की नाही याचा सर्वप्रथम खुलासा करावा. जर नियामक मंडळाला तसे वाटत असेल तर वक्त्याला व त्याच्या चार साथीदारांना (कार्यक्रमाचे आयोजन करणारे चार शिक्षक) सोसायटी काय शासन करणार, याचे उत्तर त्वरीत द्यावे असे मि. जाईल्स यांनी सोसायटीला कळविले.

सोसायटीच्या कार्यकारिणीस डी.पी.आय.मि. जाईल्स यांचा हा व्यवहार आवडला नाही. परंतु केवळ अकरा वर्षेच वय असणाऱ्या बाल्यावस्थेतील अहमदनगर एज्युकेशन सोसायटीला वासाहतिक राजवटीच्या रोषापासून वाचविण्यासाठी त्यांना सरकारी आदेशाप्रमाणे वागणे भाग होते. त्यानुसार संस्थेच्या भवितव्याचा विचार करून शिक्षकांनी राजकीय पत्र चालविण्यास मदत करावी हे सोसायटीच्या नियमाबाहेर आहे व त्याबद्दल सरकारी अधिकारी सांगतील त्याप्रमाणे वागण्यास सोसायटी तयार आहे, असे नियामक मंडळाने कळविले. त्यानंतर सरकारकडून सोसायटीवर बंधन घालणाऱ्या काही अटी लिहून आल्या व सोसायटीनेही त्या अंमलात आणण्याचे मान्य केले. त्या अटींचे सर्वसाधारण स्वरूप खालीलप्रमाणे होते.

१. मुख्याध्यापक श्री. मोडक व त्यांचे चार सहकारी शिक्षक मित्र श्री. भारदे, श्री. दाभोळकर, श्री. धसे व श्री. निसळ यांना सोसायटीतुन काढून टाकावे.
२. साप्ताहिक सुदर्शनचा मालक व चालक असलेला विद्यार्थी लालचंद पुनमचंद यालाही शाळेतून काढून टाकावे.
३. यापुढे कोणत्याही शिक्षकाने राजकारणावर व सार्वजनिक सभेत भाषण करू नये व कोणत्याही वृत्तपत्राशी संबंध ठेवू नये.

शिक्षक श्री. धसे, श्री. निसळ व विद्यार्थी लालचंद पुनमचंद हे अगदी तरूण असल्यामुळे त्यांच्यावर दया करण्यात यावी अशी विनंती सोसायटीने केली. शिक्षणाधिकाऱ्यांनी ती मान्यही केली. सोसायटीने श्री. मोडक, श्री. भारदे व श्री. दाभोळकर या तीन शिक्षकांना कमी केल्याशिवाय या शाळेचे अनुदान मंजूर करू नये, असा आदेश मुंबईच्या गवर्नरने दिला. शिवाय या तीनही शिक्षकांना सरकारी मदतीवर चालणाऱ्या कोणत्याही शाळेने कामावर घेऊ नये असा आदेश सर्व शाळांना देण्यात आला. सरकारी हुकूमांचे पूर्णपणे पालन होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी येथून पुढे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीने आपल्या नियामक मंडळात जिल्हा कलेक्टर, जिल्हा न्यायाधिश व जिल्हा शिक्षणाधिकारी यांचा कायमचा समावेश करावा व हाच नियम सरकारी नियंत्रणाखाली असणाऱ्या सर्व शाळांना सक्तीने लागू करावा असे फर्मान काढण्यात आले.

थोडक्यात, राजसत्तेचा कोप शांत करण्यासाठी व तिची कृपादृष्टी राखण्यासाठी (कारण अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे अस्तित्व राखण्यासाठी तेच आवश्यक होते) सोसायटीला श्री. मोडक, श्री. भारदे व श्री. दाभोळकर या तीन हुशार, विद्यार्थीप्रिय व विद्याभिलाषी शिक्षकांना कायमचे मुकावे लागले.

संदर्भ :

१. पारखे हरी गणेश, आमचा नगर जिल्हा, पुणे, १९३१.
२. अहमदनगर नगरपालिका शतसांवत्सरीक स्मारक ग्रंथ, अहमदनगर नगरपालिका प्रकाशन, अहमदनगर, १९५४.
३. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल शतसांवत्सरीक व हिरकमहोत्सवी स्मारक ग्रंथ, अहमदनगर एज्युकेशन सोसायटी प्रकाशन, अहमदनगर, १९५५.
४. संपा. मिरीकर रा. गो., अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय प्रकाशन, अहमदनगर, १९६८.
५. स्मरणिका, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर, जुलै १९७३.
६. इंवरे स. दा., नगर पंचशताब्दी विशेषांक, सकाळ न्युजपेपर प्रा. लि., पुणे, १९८९–९०.
७. दर्डा राजेंद्र, नगर पंचशताब्दी विशेषांक, लोकमत प्रकाशन, अहमदनगर, १९९०.

**************

The New Miraj Education Society's

# KANYA MAHAVIDYALAYA, MIRAJ

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

**One Day Multidisciplinary National Seminar**

**On**

## "Emerging Trends and Issues in Social Sciences"

**Saturday, 1st February, 2020**

**Organized by**

**Departments of Economics, Geography, History, Political Science, Psychology, Sociology, Physical Education & Sports**

*This is to certify that*

*Prof./Dr./Mr./Mrs./Miss.* अर्चना टाक ............ *of* राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर. ............ *has actively participated in the seminar/ presented research paper/ worked as a resource person for the technical session/ chairperson/ member of the organizing committee in the One Day Multidisciplinary National Seminar on "Emerging Trends & Issues in Social Sciences" held on 1st February, 2020.*

*Title of the Research Paper presented:* "१९१७ चा शिवजयंती उत्सव व अहमदनगर एज्युकेशन सोसायटी."

# Certificate

Dr. Manjiri M. Kulkarni
Seminar Convener

Mr. Raju P. Zadbuke
Principal & Organizing Secretary